## सूचना (NOTIFICATION)

## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील सरळसेवा भरती - २०२१

म्हाडा सरळसेवा भरती २०२१ करीता दि.३१.०१.२०२२, दि.०१.०२.२०२२, दि.०२.०२.२०२२, दि.०३.०२.२०२२, दि.०७.०२.२०२२, दि.०८.०२.२०२२, व दि.०९.०२.२०२२ रोजी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेण्यात आल्या होत्या. या परीक्षेस हजर असलेल्या सर्व उमेदवारांचे ऑब्जेक्शन व नॉर्मलायजेशन नंतरचे गुण म्हाडाच्या अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत. म्हाडा सरळसेवा भरती मध्ये कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकाराबाबत असहिष्णू धोरण अवलंबिण्यात आले आहे. याच धोरणानुसार परीक्षेच्या वेळी गैरप्रकार करताना आढळलेल्या किंवा गैरप्रकार करण्याच्या प्रयत्नात असणा-या उमेदवार/व्यक्तीं विरुध्द एफ़. आय. आर. दाखल करून त्यांना पोलीसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. पोलीस तपासात ज्या उमेदवार / व्यक्तींची नावे समोर येत आहेत त्यांची सर्व माहिती पोलीसांना पुरविण्यात येत असून पोलीसांना सर्व प्रकारचे सहकार्य करण्यात येत आहे. याशिवाय यापुढील प्रक्रियेमध्ये देखील पूर्ण काळजी घेण्यात येणार असून खालीलप्रमाणे उपाय योजण्यात येत आहेत.

ज्या उमेदवारांना कागदपत्र तपासणी करीता बोलाविण्यात येणार आहे. त्या सर्व उमेदवारांचे परीक्षेचे लॉग डीटेल्स तपासण्यात येणार आहेत. लॉग डीटेल्सचे आधारे त्या उमेदवारांचे बिहेविअर ॲनलिसीस करण्यात येणार असून ॲनलिसीस शंकास्पद असल्यास त्याची योग्य त्या यंत्रणेमार्फ़त चौकशी करण्यात येईल.

कागदपत्र तपासणी करीता आलेल्या उमेदवारांचे फ़ोटो आणि दोन्ही हाताचे ठसे घेण्यात येतील. अर्ज भरताना अपलोड केलेला फ़ोटो व परीक्षा केंद्रावर काढलेल्या फ़ोटो व स्वाक्षरी सोबत जुळवून पाहण्यात येईल. फ़ोटो /स्वाक्षरी जुळत नसेल तर त्यास शंकास्पद वर्गवारीमध्ये ठेवून त्यांची चौकशी करण्यात येईल.

याच प्रकारची कार्यवाही नियुक्ती पत्रानंतर उमेदवार प्रत्यक्ष रुजू होण्याकरीता येतील त्यावेळीही करण्यात येईल. नियुक्ती देण्यापूर्वी उमेदवारांकडून शपथपत्र घेण्यात येईल. शपथपत्राचा मसुदा गुण तालिका बाबतच्या नोटीफ़िकेशन सोबत प्रसिध्द करण्यात आला आहे. उक्त कार्यवाही गैरमार्गाचा अवलंब करणा-या उमेदवारांना योग्य ती शिक्षा व्हावी व गुणवान उमेदवारांवर अन्याय होऊ नये याकरीता करण्यात येणार आहे. यास्तव या प्रक्रियेमध्ये उमेदवारांनी म्हाडा प्रशासनास सहकार्य करावे.

**सचिव**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**

Scanned with CamScanner